# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा केंद्रांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे आणि कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी स्वतंत्रपणे भेटी देवून परीक्षांचा आढावा घेतला. विद्यापीठाने केलेल्या जनजागृतीचा परिणाम दिसत असून यावर्षी परीक्षांमधील कॉप्यांच्या प्रमाणात लक्षणीय घट दिसून येत आहे.

विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबरच्या परीक्षा दिवाळीच्या आधी सुरु झाल्या आहेत. विद्यापीठाने यावर्षी तणावमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेतल्या जाव्यात यासाठी गेल्या दोन महिन्यांपासून जाणीवपूर्वक प्रयत्न करून जनजागृती केली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर (हॉलतिकीट) कॉपी केल्यास कोणत्या प्रकारची शिक्षा होवू शकते याची माहिती दिल्यामुळे या सत्रात कॉपी करण्याचे प्रमाण घटले आहे.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी बुधवारी जामनेर येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी येथील गरूड महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील खडसे महाविद्यालयात सुरु असलेल्या परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे होते. गुरुवारी साक्री येथी सी.गो. पाटील महाविद्यालयाला देखील कुलगुरूंनी भेट दिली. विद्यापीठाने झालेल्या परीक्षांचे तातडीने ऑनलाईन मुल्यांकन सुरु केले असून कुलगुरूंनी भेटी दिलेल्या महाविद्यालयात मुल्यांकन केंद्रालाही भेट देवून माहिती घेतली. सर्व प्राध्यापकांनी या मुल्यांकन प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी केले आहे.

प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे एरंडोल येथील डी.एस. पाटील महाविद्यालय, धुळे येथील झेड बी. पाटील महाविद्यालय, एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय आणि पालेशा महाविद्यालयाला भेटी देवून परीक्षांचा आढावा घेतला. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षणमंडळाचे महाविद्यालय, पंकज कला महाविद्यालय व सामाजिक कार्य महाविद्यालय, शिरपूर येथील एस.पी.डी.एम. महाविद्यालय, आर.सी. पटेल महाविद्यालय, एच.आर.पटेल महिला महाविद्यालय तसेच नरडाणा येथील ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय व थाळनेर येथील महाविद्यालयात सुरु असलेल्या परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

## बातमी नं. २

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एम. ए. राज्यशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस कै. अण्णासाहेब तुकाराम विठ्ठल पाटील यांच्या स्मरणार्थ सुवर्ण पदक सुरु करण्यासाठी शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील व प्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांनी विद्यापीठाकडे धनादेश सुपूर्द केला.

प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्याकडे डॉ. संजय पाटील यांनी हा धनादेश दिला. एम.ए. राज्यशास्त्र या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला कै. अण्णासाहेब तुकाराम विठ्ठल पाटील यांच्या स्मरणार्थ सुवर्ण पदक दिले जाणार आहे. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, प्रा.शशिकांत बोरसे उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

## बातमी नं. ३

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेतर्फे "सायबर सुरक्षा" या विषयावर डॉ. सोमनाथ वडनेरे यांचे व्याख्यान झाले.

यावेळी बोलतांना डॉ. वडनेरे म्हणाले की, सोशल मीडिया दुधारी तलवारी सारखी असून त्याचा योग्य वापर केल्यास यासारखे संदेशवहनाचे परिणामकारक दूसरे चांगले माध्यम नाही. सोशल मीडियामुळे मिळणाऱ्या ज्ञानाचा फायदा आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी निश्चित होतो. मात्र थोडासा निष्काळजीपणा आयुष्यास वेगळे वळण लावतो. अनोळखी व्यक्तिकडून आलेली फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारु नका. आपले अत्यंत पर्सनल फोटो शेअर करु नका. शक्यतो ग्रुप फोटो शेअर करा. विविध प्रसंगाचे फोटो शेअर करतांना सामाजिक भान ठेवा. त्यामुळे तुमचे लोकेशन डिटेक्ट होऊ शकते. फेसबुक पासवर्ड आणि ईमेल पासवर्ड वेगवेगळा ठेवा.

या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. अजय पाटील यांच्या मार्गदशनाखाली डॉ. समाधान कुंभार यांनी केले होते. सुत्रसंचलन डॉ. समाधान बनसोडे तर आभार डॉ. प्रशांत सोनवणे यांनी मानले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २३ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी